मंत्री/राज्यमंत्री/उपमंत्री दौरे-पावर असताना त्यांना पोलीस एस्कॉर्ट देण्यासाठी त्यांच्या संबंधित विभागाची एक जीप उपलब्ध करुन देण्याबाबत.

---

महाराष्ट्र शासन

गृह विभाग (विशेष),

परिपत्रक क्र. एसएसए-२०९१/२७१७/विशेष-३,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १७ ऑगस्ट १९९१.

परिपत्रक :- निरनिराळ्या विभागांचे मंत्री/राज्यमंत्री/उपमंत्री हे राज्यात ठिकठिकाणी जेव्हा दौरे-पावर असतात तेव्हा त्यांच्यासाठी पोलीस बंदोबस्त पुरविण्यात येतो. त्यासाठी पोलीस गाडीही देण्यात येते. तथापि, मंत्र्यांचे दौरे वारंवार होत असल्यामुळे आणि त्यांना पोलीस एस्कॉर्ट देण्यासाठी पोलीस दलाकडे गाड्यांची स्वतंत्र व्यवस्था नसल्यामुळे अन्य पोलीस शाखाकडून गाड्या काढून घेऊन त्या मंत्र्यांच्या पोलीस एस्कॉर्टसाठी द्याव्या लागतात. राज्यातील काही महत्त्वाच्या ठिकाणी राज्य/केंद्र शासनाचे मंत्री व अतिमहत्त्वाच्या व्यक्ती सतत भेटी देत असतात. तसेच काही वेळा एकापेक्षा अधिक मंत्री व अति महत्त्वाच्या व्यक्ती एकाच वेळी एखाद्या ठिकाणी भेट देत असतात. अशा वेळी त्यांना पोलीस बंदोबस्ताबरोबर पोलीस एस्कॉर्ट गाडी उपलब्ध करुन देणे अवघड होते आणि त्याचा पोलीस दलावर बोजा ताण पडतो.

२. म्हणून उपरोक्त परिस्थिती विचारात घेऊन सर्व मंत्रालयीन प्रशासनिक विभागांना असे सुचविण्यात येते की, मंत्री/राज्यमंत्री/उपमंत्री हे ज्यावेळी एखाद्या ठिकाणी दौरे-पावर जातील त्यावेळी पोलीस एस्कॉर्टसाठी त्यांच्या संबंधित विभागांनी त्यांची एक जीप गाडी पोलीस दलास उपलब्ध करुन द्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ क.गो. देशपांडे ]

कार्यासन अधिकारी, गृह विभाग (विशेष), महाराष्ट्र शासन.

HOME DEPARTMENT
ISSUED
Date 31/8/91
Number of Issue 150

प्रत,

सर्व मंत्रालयीन प्रशासनिक विभाग,
मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री/उपमंत्री यांचे खाजगी सचिव,
महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व पोलीस आयुक्त,
सर्व पोलीस अधीक्षक.

---

एस.एस.के/-